ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१ !



jpp51_51@jnanaprabodhini.org

गोष्ट क्र. १३

२८ मार्च २०२१

महेश आठवले
(१९७०-१९७७)



माझ्या डोक्यात एक पक्की खूणगाठ आहे की समाज आणि परिस्थिती आपोआप बदलत नसते. समाज ही intangible गोष्ट आहे. अनेक व्यक्तींचा मिळून समाज बनतो. त्यामुळे व्यक्ती सुधारली की समाज सुधारेल.

भारतीय समाजात ब्रम्हचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास अशा चार आश्रमांची मांडणी केलेली आहे. आजकाल संन्यास कोणी फारसे घेत नसले तरी वानप्रस्थाश्रम नक्की घेता येतो. वनात न जाता मनाने घेता येतो. वैयक्तिक अर्थार्जनाकडे कमी लक्ष देऊन देशाचे प्रश्न महत्त्वाचे मानता येऊ शकतात. शाळेत आपल्याला जे ‘रूप पालटू देशाचे’ असे ऐकायला मिळाले आहे त्यानुसार आपण आपापल्या क्षेत्रातले प्रश्न आपले मानून नक्की काम करू शकतो.

**शाळा आणि सांगाती**



मी पाचवी ते अकरावी प्रशालेमध्ये होतो. माझे वर्गमित्र म्हणजे धनंजय केळकर, किशोर पाटील, मिलिंद काळे असे २०-२२ जण होतो. सगळ्या मित्रांची संपूर्ण नावे आमच्या लक्षात राहायची. सकाळी १० ते रात्री ८ अशी शाळेची वेळ असायची. संध्याकाळी मैदानावर खेळणे सक्तीचे होते. मैदानाला दांडी मारली तर परीक्षेला बसू द्यायचे नाही. दलावर पथक पद्धती होती ती फार सुंदर होती. 'रामदास', 'दयानंद', 'विवेकानंद', 'अरविंद' अशी पथके असायची आणि ती दरवर्षी बदलायची. मी शाळेत शिकत असताना आदरणीय गिरीशराव, मोहनराव, विवेक कुलकर्णी, भाई फडके, मनोज नरवणे, अजित कानिटकर देखील शाळेत शिकत होते. पथक पद्धती अभूतपूर्व होती. त्यामुळे फक्त आपल्या वर्गातील नव्हे तर वेगवेगळ्या वर्गातील मुले एकत्र यायची. पथकामध्ये अतिशय अनौपचारिक आणि कुटुंबाप्रमाणे वातावरण होते. आम्ही घरून दोन वेळचा डबा घेऊन यायचो. मधल्या सुट्टीत एक आणि शाळा सुटली की दुसरा डबा आम्ही खात असू. मैदानावर गेल्यावर आम्ही सगळ्या प्रकारची कामे स्वत: करत असू. मैदान साफ करणे, पाणी मारणे, फक्की आखणे अशा कामांचा तेव्हा कंटाळा यायचा, मात्र आज त्याचे महत्त्व समजते आहे. शाळेतील संडास-बाथरूम देखील आम्ही साफ केलेले आहे. त्याचा फायदा असा, की आता कुठल्याही कामाची लाज वाटत नाही. दुसरे म्हणजे आता लॉकडाऊनमध्ये भांडी घासायला देखील त्याचा उपयोग झाला असे म्हणायला लागेल. आम्ही महिन्यातून एकदा वर्गाची स्वच्छता करत असू. **मला आठवतंय आमच्या वर्गात काचेचा मोठा फळा टेबलावर ठेवलेला होतो आणि साफ करत असताना तो फळा घसरला, फुटला आणि त्यावर मी आपटलो. पूर्ण रक्तबंबाळ झालेलो असताना विकुने अत्यन्त काळजी पूर्वक प्रथमोपचार केला.** कुणीही मला फळा का फोडला ? म्हणून रागावले नाही. सर्वांना माहीत होते की चुकून झालेला हा अपघात होता. अतिशय प्रेमाने माझ्यावर उपचार केले आणि सगळ्यांनी विचारपूस केली. त्यावेळी शेजारी दगडी इमारत होती. कै. ती. आप्पा तिथे राहत असत. तिथे शेंगांचे पोते असायचे आणि आम्हाला मुक्तसंचार असायचा. आम्ही रोज शेंगा खायला तिथे जात असू.

पाचवीमध्ये आम्ही इंग्रजी देवनागरी मधून शिकलो. एकाचवेळी नवीन भाषा आणि नवीन लिपी याचा ताण पडू नये म्हणून अभिनव अशा पद्धतीने आम्ही इंग्रजी शिकलो. आम्ही 'आय ॲम अ बॉय' असे देवनागरीतून लिहायला लागलो आणि प्रथम भाषा समजून घेतली. त्यानंतर सहावी पासून आम्ही I am a boy असे लिहायला शिकलो. पाचवी पासूनच आम्हाला संस्कृत होते. कै. ती. वामनराव आम्हाला गणित आणि संस्कृत शिकवत असत. अतिशय कडक अशी शिस्त होती. काही चुकले की ते बोटामध्ये पेन्सिल धरून दाबायचे. आम्हाला सगळे अध्यापक त्यावेळी शिक्षा करायचे. आत्तासारखे त्यावेळी शिक्षा करायला आणि पालक काय म्हणतील अशी भीती/बंधने नव्हती. ती. यशवंतराव सामाजिक अध्ययन असा विषय शिकवायचे. अशा अनेक आठवणी आहेत. मुख्य म्हणजे आम्हाला पठडीबाहेरचा विचार करायला शिकवले. कै. ती. आप्पा आमचा 'पज्ञा' चा तास म्हणजे परिस्थिती ज्ञानाचा तास घ्यायचे. तात्कालिक परिस्थितीवर आमच्याशी बोलायचे, गप्पा मारायचे. आम्ही फार सुदैवी होतो की कै. ती. आप्पांचा सहवास आम्हाला लाभला. कै. ती. आप्पा अतिशय आपुलकीने आणि प्रेमाने आमच्याशी बोलायचे. आज मागे वळून पाहताना आमच्या या आठवणी अजूनही लक्षात आहेत आणि हे सर्व मित्र आजही संपर्कात आहेत. **शाळा हे एकमेव ठिकाण असे आहे की नंतर तुम्ही कोणीही व्हा तुम्ही वेगवेगळे कार्यक्षेत्र निवडा मात्र वर्गात तुम्ही सगळे सारखेच असता आणि त्यामुळे कदाचित नंतरही तुमची मैत्री टिकून राहते.** आमच्या वर्गात तर सगळे नमुने आहेत. मिलिंद काळे आता कॉसमॉसचा अध्यक्ष झाला आहे. धनंजय केळकर दीनानाथ मध्ये अप्रतिम काम करत आहे. सुदर्शन हसबनीस लष्करात मोठ्या जबाबदारीच्या पदावर आहे. किशोर पाटीलने बक्कळ पैसा कमावला आहे. मात्र उत्तम हस्ताक्षर असलेला किशोर त्यावेळी वर्गात खूप साधा होता आणि आजही खूप साधा राहतो. शाळेत असताना आम्ही जोंधळे चौकात त्याच्या घरी जात असू. आम्ही सगळ्यांनी एकत्र खूप दंगा केलेला आहे. मी आणि धनंजय बॉक्सिंगचे जोडीदार होतो. आपल्या शाळेच्या अंगणात बॉक्सिंगच्या बॅग टांगलेल्या असत आणि आम्हाला तिथे रोज सराव करायला लावायचे. शाळेने आम्हाला भरभरून दिले आणि त्याबद्दल किती सांगावे असे होते. आपल्या सारखी दुसरी शाळा नाही.

## कृती उपक्रमातून घडण


युवक विभागाचे त्यावेळचे प्रमुख म्हणजे युवक प्रतोद मोहनराव होते. ते उत्तम कबड्डी खेळायचे. कबड्डी संघाचे ते कर्णधार होते आणि आमच्या पथकाचे पथक प्रमुख होते. त्यावेळी पथकातील कुणी नवीन काही गोष्टी केल्या तर क्रेडिट पॉइंट दिले जायचे. सावंत म्हणून एका विद्यार्थ्याने 'ओम' हा शब्द दीडशे वेगवेगळ्या पद्धतीने लिहून काढला म्हणून त्याला पाच क्रेडिट पॉइंट देण्यात आले होते. **वर्षभरात असे काहीतरी इनोव्हेटीव करायला आणि नवीन विचार करायला प्रेरणा देत असत.** रघुनाथ खाडीलकर म्हणून माझ्या वर्गातील मित्राने रेशन कार्डवर मिळणाऱ्या दुधाच्या बाटल्यांची चांदीची टोपणे गोळा केली होती. आम्ही त्यात गोट्या टाकून मारामाऱ्या करायचो. गोटी सोडली की चांदी त्याभोवती उडायची. असा नवीन खेळ त्याने शोधून काढला म्हणून दोन क्रेडिट पॉइंट त्याला दिले होते. गड-किल्ले तर असायचेच, आम्हाला रात्री चालायला सांगायचे. थंडीत कुडकुडत हिवाळी शिबिरे व्हायची. पहाटे पाचला थंडीत उठवायचे. शिबिरात नाश्त्याला ब्रेड आणि सॉस असायचा. त्याचे मला फार अप्रूप वाटायचे कारण माझ्या घरी तेंव्हा ब्रेड चालायचा नाही. **त्यावेळी आम्हाला 'टास्क' म्हणजे 'केलेच पाहिजे असे काम' दिले जायचे. काहीतरी भन्नाट कल्पना काढलेली असायची आणि आम्हाला ते काम पूर्ण करायचे असायचे. एके वर्षी मला सांगितले होते की धारदार चाकू आणि फडके घेऊन शाळेत यायचे. शाळेत आल्यावर सांगितले की लकडी पूल ते दगडूशेठ मंदीरापर्यंत लक्ष्मी रोडवर रस्त्यावर ज्या घाणेरड्या जाहिराती चिकटवलेल्या असतील त्या चाकूने काढायच्या आणि फडक्याने भिंतींची स्वच्छता करायची. एक वर्षी मला पंधरा रुपये दिले आणि मंडई मधून पेरू खरेदी करून कात्रजच्या घाटात जाऊन रस्त्याच्या कडेला विकायचे असे सांगितले होते. अशा टास्क मधून विविध प्रसंगांना तोंड द्यायचे धाडस तयार झाले. टास्क पूर्ण करत असताना आजुबाजूचे लोक विचारतात आणि त्यांना उत्तरे द्यायचे धाडस यायचे. आम्ही आमचे टास्क पूर्ण करतो आहोत की नाही हे तपासायचे टास्क दुसऱ्याला दिले जायचे.** मी पेरू घेऊन घरी जाऊन खाल्ले की कात्रज घाटात विकले हे पहायला कुणीतरी हवा ना? किमान त्या पंधरा रुपयांचे मी अठरा रुपये केले की नाही हे तपासायचे. Business आणि marketing skills तिथे वापरायला लागायच्या. आमचे शिवापूरला शिबिर होते तिथे आम्हाला भरदुपारी जेवायला वाढले होते. पोळी, भाजी आणि गुळ असे जेवण होते. इतके ऊन होते की ताटातला गुळ वितळला. आमची डोकी गरम झाली. मग आम्ही पाढे म्हणायला सुरुवात केली... 'आम्हाला लवकर वाढा, लवकर वाढा' पण त्यातून आम्ही सहनशक्ती शिकलो. भूक आवरायला शिकलो. आम्हाला त्रास देण्याचा हेतु नसायचा मात्र आमचे शिक्षण त्यातून झाले. तासभर आम्हाला तसेच बसून ठेवले होते.

शारीरिक, मानसिक, सामाजिक, बौद्धिक, भावनिक घडण शाळेत होत होती. आम्ही पुष्कळ मार खाल्लेला आहे. आम्हाला चित्रकलेला खरे सर होते. ते फार गमतीशीर बोलत असत. माझ्या वर्गात संदीप म्हणून अंगकाठीने बारीक असा मित्र होता. आता तो मानसोपचारतज्ज्ञ आहे. तो किंवा इतर कोणी चुकला की त्याला अंगठे धरून उभे करायचे आणि वाकलो तर चड्डी धरून उचलायचे आणि मग आम्ही हवेत हातपाय मारत लटकायचो असे मजेदार अनुभव आहेत. पद्य, पाठांतर, गणपती बसवणे अशा अनेक गोष्टी करायचो. गणपतीमध्ये आरती आणि मंत्रपुष्पांजली म्हणायचे काम माझ्याकडे असायचे. कै. ती. वामनराव आणि मी 'यज्ञेन यज्ञमयजंत देव:' म्हणायचो. मी लहापणापासून जाड होतो आणि वामनराव अगदी बारीक, आम्ही शेजारी-शेजारी उभे राहिलो की फार मजेशीर दिसायचो. अशा सगळ्या आठवणी आहेत. हे सगळेच प्रसंग तेव्हा आवडायचेच असे नाही. कधी-कधी त्रास व्हायचा, रडू यायचे. पाचवी-सहावीमध्ये आपण लहान असतो मात्र त्यावेळी शिकलेल्या गोष्टींचे महत्त्व आज लक्षात येते आहे. **आम्हाला ठाकून-ठोकून घडवलं सगळ्या शिक्षकांनी, सरळ मार्गावर आणलं. मारामाऱ्या करायला पण शिकवल्या.** न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर आम्ही खेळायला जायचो त्यावेळी आजूबाजूची टारगट मुले त्रास द्यायची. त्यामुळे एकट्या-दुकट्याने जाणे शक्य नव्हते. मग आम्ही सगळे त्या मुलाच्या घरी जाऊन दंगा करायचो असेही प्रसंगांना तोंड द्यायचे आमचे शिक्षण झाले. 'दीर्घ अभ्यास' असा काहीसा प्रकार असायचा, की शाळेत येऊन १६-१६ तास सलग अभ्यास करायचा. दर सोमवारी आमच्या बैठका असायच्या त्यात विविध चर्चा आणि निर्णय व्हायचे. आप्पांच्या पीएचडी साठीचा विषय 'सहविचार नेतृत्वपद्धती' असा होता. सोमवार बैठकांची टिपणे काढेलली दैनंदिनी ५० वर्षांनंतर आजही माझ्या जवळ आहे.

## बी.एम्.सी.सी. च्या आठवणी

कॉमर्सला जायचा निर्णय मी आठवीमध्ये असतानाच घेतला. आपल्या शाळेत पूर्वी तशी सोय होती. आम्हाला 'आठवले' म्हणून एक शिक्षक होते ते आम्हाला अकौंट्न्सी, अर्थशास्त्र, ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स असे विषय शिकवायचे.

त्यामुळे आठवी–नववीमध्येच माझे बायोलॉजी, बॉटनी, केमिस्ट्री हे विषय संपले. त्यावेळच्या नियमाप्रमाणे मी अकरावीमधून बीएम्‌सीसी मध्ये थेट एफ.वाय. ला गेलो. बीएम्‌सीसी मध्ये वर्गातील सर्व मुलांपेक्षा मी एक वर्षाने लहान होतो. माझा जन्म १९६१ चा आणि १९७८ ला मी एफ.वाय. ला होतो. कॉमर्सचा अभ्यास आधीच झाला असल्याने मी वर्गात एकदम 'चमको' होतो आणि प्रबोधिनीची मुले कुठेही गेली तरी उठून दिसतातच. आपल्या बोलण्यातून आणि वागण्यातून इतरांना ते जाणवते. आम्हाला त्यावेळी ती. अनिरुद्ध देशपांडे शिकवायला होते जे नंतर बीएम्‌सीसीचे प्राचार्य झाले. त्यांनी मी एफ.वाय.ला असतानाच वर्गात एके दिवशी विचारले की तू कुठल्या शाळेत होतास? मी उत्तरलो 'ज्ञान प्रबोधिनी'. त्या वेळी ते म्हणाले, **मला वाटलंच होतं की तू प्रबोधिनीचा असशील! बहुदा आपल्या कपाळावरच असं लिहिलं जात असावं की हा प्रबोधिनीचा प्रॉडक्ट आहे.** पुढे मी बीएम्‌सीसीमध्येच M. Com. पूर्ण केले. त्याच क्षेत्रात पुढे मग CS केले मग LLB केले. सुदैवाने प्रबोधिनी मधील वातावरण परंपरेला धरून, काहीसे धार्मिक असे आहे. प्रबोधिनीमध्ये संस्कारांचा आग्रह असतो. मात्र महाविद्यालयात गेल्यावर एकदम वेगळे वातावरण आणि स्वातंत्र्य मिळते. दाबून ठेवलेला फुगा एकदम मोकळा सोडला की जे धोके असतात त्याप्रमाणे दुर्दैवाने काही मुलांच्या बाबतीत झाले. प्रमाण अगदी कमी असेल पण काही जणांच्या बाबतीत अशा अडचणी निर्माण झाल्या. त्यांना वातावरणातील या मोठ्या फरकाशी सहज जुळवून घेणे अवघड गेले. आमच्या वेळी प्रबोधिनीमध्ये युवती प्रशाला सुरू झालेली नव्हती. त्यामुळे मुलींशी बोलणे म्हणजे काहीतरी भयंकर अशी आमची समजूत होती. महाविद्यालयात तेव्हा सुद्धा मोकळे वातावरण असायचे. मी संघाच्या शाखेवर देखील जात होतो. त्यामुळे हे संस्कार अबाधित राहिले आणि वाढले. आपण मैदानावर ज्या आज्ञा हिंदीत देतो त्या शाखेवर संस्कृतमध्ये असतात एवढाच फरक आहे. बाकी देशाचा विचार दोन्हीकडे सारखाच आहे. **महाविद्यालयात किंवा कुठेही गेलो तरी पुढाकार घेऊन काम करण्याची वृत्ती शाळेतील संस्कारांमुळे तयार झाली असं मला वाटतं.** शाळेत असताना मी रानडे वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला होता, वेगवेगळ्या वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेत आम्ही उतरत असू. त्यामुळे शिक्षकांच्या नजरेत मी आलो. मी पाचवीला गणितात नापास झालो होतो. त्यावेळी एखादा नापास झाला की पुन:परीक्षा द्यायला लागायची. मी पुन:परीक्षेत पास झालो किंवा पास केलं असेल. मात्र महाविद्यालयात गेलो तेव्हा तिथले सगळे गणित माझे आधीच झालेले होते. वर्गात माझ्याकडे सगळे गणिततज्ज्ञ म्हणून पहायचे. मला काही फार अक्कल नव्हती पण शाळेत आधी शिकलेलो होतो. गणित आवडत नाही म्हणून मी CA कडे न जाता भाषेची आवड असल्याने CS झालो.



स्वामी वरदानंद भारती यांच्या बरोबर उत्तरकाशी येथे

### पाच आघाड्यांवरच्या जबाबदाऱ्या

**सध्या मी पाच आघाड्यांवर आहे. पोटापाण्यासाठी मी कंपनी सेक्रेटरी म्हणून काम पाहतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काही काम माझ्याकडे आहे. तिसरी आघाडी अशी, की निवडणुका लढवून इंस्टीट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीचा मी सेंट्रल कौन्सिल मेंबर होतो नंतर दिल्लीमध्ये ऑल इंडिया प्रेसिडेंट झालो. त्यानंतर इंटरनॅशनल फेडरेशनमध्ये होतो. चौथी आघाडी म्हणजे माझे वडील (प्राचार्य अनंतराव आठवले तथा ब्रह्मीभूत प. पू. स्वामी वरदानंद भारती) यांचे मोठे काम आहे त्याला मी हातभार लावतो. कै. ती. दासगणू महाराज माझे आजोबा. नांदेडजवळ गोरटं नावाच्या गावात पारमार्थिक आणि अध्यात्मिक क्षेत्रात मोठे काम चालते. माझ्या वडिलांनी भगवद्गीता, उपनिषदे, ब्रह्मसूत्रं अशा विषयांवर साधारण ८० पुस्तके लिहिली आहेत. त्या ट्रस्टचा मी अध्यक्ष आहे आणि ते काम पण मी पाहतो. पाचवी आघाडी म्हणजे डेक्कन एज्यूकेशन सोसायटीचे काम करतो.**



ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीच्या अध्यक्षपदी निवड

**शाळेनी मला काय दिले? मुद्देसूद सांगायचे तर, पहिले म्हणजे वेळेचे नियोजन कसे करावे? वेळ वाया घालवायचा नाही हे शिकवले.** मी मोबाईल अतिशय मर्यादित वापरतो. मजेच्या वेळी भरपूर मजा आणि कामाच्या वेळी काम हे शाळेने शिकवले. तिसरी गोष्ट म्हणजे निर्णय घ्यायला घाबरायचे नाही हे शिकलो. निर्णय

घेताना सगळ्या सदस्यांना विश्वासात घ्यायला शिकलो. आत्ताच्या भाषेत सांगायचे तर take into confidence all stake-holders. **खरंतर कै. ती. आप्पांनीच आम्हाला सहविचारात्मक नेतृत्व पद्धती शिकवली. आपल्या बैठकांमध्ये निर्णय होतात आणि त्यामध्ये सगळे आपले विचार सांगतात. एकदा निर्णय घेतला की मग तो भलेही तुम्हाला आवडो किंवा नावडो, त्यावर कुरकुर न करता पुढे काम सुरू करायचे हे शाळेने शिकवले.** सगळेच निर्णय एकमताने होणे शक्य नसते. विशेषत: डीईएस सारख्या संस्थेत जिथे अनेक लोक असतात अशा संस्थेत निर्णय घेणे थोडे अवघड असते. किंवा 'कंज' (KANJ) नावाची आमची पाच जणांची भागीदारी आहे. तिथे जवळपास १०० जणांचा स्टाफ आहे. भारतातल्या मोठ्या फर्म पैकी एक अशी फर्म आहे. तिथेसुद्धा निर्णय घेताना भागीदारीचा धर्म आम्ही पाळतो. सगळ्यांचे मत विचारात घेऊन निर्णय घेतो. आता मोदीजींची जी 'सबका साथ, सबका विकास' ही घोषणा आहे तसे काम आपल्या शाळेत खूप आधीपासून सुरू आहे. **'विकसता विकसता विकसावे' ही शाळेची कधीही रिकामी न होणारी शिदोरी आहे.** हे सर्व मला आज पाचही आघाड्यांवर कामाला येते. कंपनी सेक्रेटरी हा प्रकार २५-३० वर्षापूर्वी खूप नवीन होता.



**कंज अॅन्ड असोसिएटस् भागीदारांबरोबर**

आधी मला माझ्या नातेवाईकांना पटवावे लागले की हे पद मानाचे आहे आणि बोर्ड मीटिंग मध्ये आम्ही वरिष्ठांच्या मांडीला मांडी लावून बसतो. निर्णय घेताना तो कायद्याच्या चौकटीत घेतला जातोय ना हे पाहण्याचे आमचे काम असते. मग तुम्ही कर्मचारी म्हणून काम करा किंवा सल्लागार म्हणून काम करा, कामाचा प्रकार सारखाच असतो. थोडक्यात संचालक मंडळाची सद्सद्विवेकबुद्धी सांभाळणे हे आम्ही करायचे असते. जेव्हा तुम्ही संस्था किंवा कंपनी चालवता तेव्हा त्यात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात. निर्णय घेताना तो अत्यंत पारदर्शीपणे तुम्ही घ्यायला हवा आणि **निर्णय घेतल्यावर तुम्ही त्याची जबाबदारी देखील घ्यायला हवी. त्यासाठी जे-जे करायला लागेल ते आम्ही करतो. प्रबोधिनीचा विद्यार्थी म्हणून समाजाच्या आपल्याकडून काही अपेक्षा असतात. लोकांचा आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोन हा निश्चित भिन्न असतो आणि त्यांच्या आपल्याकडून काही अपेक्षा असतात. आपण जर वेड्यासारखे वागलो तर लोक आपल्याला क्षमा करणार नाहीत.** ते आपल्यापेक्षा प्रबोधिनीला अडचणीत आणणारे ठरते. **तुम्ही आजन्म प्रबोधिनीचे ब्रँड अॅम्बॅसिडॉर असता ही जबाबदारीची जाणीव असायला लागते.** बऱ्याचदा आपल्याला वेगळी मते पण ऐकायला लागतात, 'प्रबोधिनीचे लोक स्वत:ला फार शहाणे समजतात' असे बोलणरे लोक पण असतात. त्याकडे आपण दुर्लक्ष करायचे. ज्यांना प्रवेश मिळत नाही ते बहुदा असे म्हणत असावेत. गमतीचा भाग सोडला, तर बहुसंख्य असे लोक आहेत ज्यांना प्रबोधिनीबद्दल कौतुक आहे, कुतूहल आहे आणि प्रबोधिनीकडून त्यांच्या काही अपेक्षा देखील आहेत.

**भारतीय समाजात ब्रम्हचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास अशा चार आश्रमांची मांडणी केलेली आहे. आजकाल संन्यास कोणी फारसे घेत नसले तरी वानप्रस्थाश्रम नक्की घेता येतो. वनात न जाता मनाने घेता येतो. वैयक्तिक अर्थार्जनाकडे कमी लक्ष देऊन देशाचे प्रश्न महत्त्वाचे मानता येऊ शकतात. शाळेत आपल्याला जे 'रूप पालटू देशाचे' असे ऐकायला मिळाले आहे त्यानुसार आपण आपापल्या क्षेत्रातले प्रश्न आपले मानून नक्की काम करू शकतो.** सुदैवाने मी शिक्षण क्षेत्रात आहे आणि DES चा उपाध्यक्ष आहे. तेव्हा या क्षेत्रात करण्यासारखे भरपूर आहे. आमच्या सर्व संस्थांत मिळून हजारो विद्यार्थी शिकतात. **पुष्कळ काम झाले असले तरी पुष्कळ काम करावे या भूमिकेत मी आत्ता आहे. सुदैवाने या सगळ्या कामात कधी मोठे अपयश आले नाही.**

आदर्श व्यवस्थापन कसे असावे यावर आजच्या काळात बरीच चर्चा होते. मला वाटते प्रथम नेत्याचे चारित्र्य चांगले पाहिजे. कुठलाही निर्णय घेताना त्याची सद्सदविवेक बुद्धी जागृत असायला हवी. निर्णय घेताना तो संस्थेच्या हिताचा आहे की नाही हे तपासायला हवे. माझे वडील नेहमी सांगायचे की चांगला माणूस कुणाला म्हणावे? अर्थत: शुचि: कामत: शुचि: स एव शुचि: इतके सोपे गणित आहे. याचा अर्थ असा, की ज्याचे पैसे कमवण्याचे मार्ग आणि पैसे वापरण्याचे मार्ग शुद्ध आणि स्वच्छ आहेत तो मनुष्य चांगला. निरपेक्ष काम करणे म्हणजे काय याची प्रत्यक्ष उदाहरणे म्हणून गिरीशराव, सुभाषराव अशी आमच्या समोर आहेत. मी आत्ता प्रबोधिनीच्या कार्यकारिणीमध्ये देखील आहे. आमच्या बैठका होतात त्यावेळी आपल्या इथले असे अनेक कार्यकर्ते आहेत ज्यांच्याकडे बघून, त्यांच्या निरपेक्ष कामाकडे पाहून मला आजही प्रेरणा नक्की मिळते.

संघटनेशिवाय काय आहे? **'संघशक्ती कलियुगे'** असे आपल्याकडे वाक्य आहे. या जगात लोकांना सोबत घेऊन काम करू शकलात तर तुम्ही टिकाल. एकट्याच्या जीवावर तुमचे काही खरे नाही. तुमचा 'कारवा' बनलाच पाहिजे. शाळेतील संस्कारक्षम वय फार महत्त्वाचे असते. माझा मुलगा पद्मनाभ पण प्रबोधीनीमध्येच शिकायला होता पण माझ्या मुलीला प्रवेश मिळाला नाही. वशिला, प्रवेशासाठी इतर मार्ग हा प्रकारच आपल्याकडे नाही. मी असे ऐकलं की कै. ती. पोंक्षे सर प्राचार्य असताना त्यांच्या मुलाला देखील प्रबोधिनीत प्रवेश मिळालेला नव्हता. इतकी साधनशुचिता आणि नियमांचे काटेकोर पालन हे आपल्या शाळेत आहे आणि त्याचा उपयोग आपल्याला होतो. हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. "conflict of intrest?' "No way!' इतके स्पष्ट आहे. त्याचा धाक निर्माण होतो. मग समयपालन म्हणजे प्रत्येक बैठक वेळेवर सुरू झालीच पाहिजे हा आग्रह इतका निर्माण होतो, की मी जिथे अध्यक्ष असतो तिथे लोक पाच मिनिटे आधी बैठकीला हजर असतात. त्यांना माहीत असते की ही बैठक वेळेवर सुरू होणार आणि वेळेवर संपणार. बैठक सुरू झाल्यावर आलतू-फालतू गप्पा नाही. असे सगळे छोट-छोटे पण महत्त्वाचे विषय आहेत.







शाळेत आम्हाला सगळे विषय शिकवले. काही विषय इंग्रजी, काही हिन्दी आणि मराठी मधून शिकलो. त्यामुळे मला तिन्ही भाषांवर प्रभुत्व मिळाले. आता कुठल्याही भाषेत बोलताना मला अडचण येत नाही. दुसरं म्हणजे संस्कृत सुभाषिते आमच्याकडून पाठ करून घेतली, त्याचा उपयोग आज मला बोलताना, भाषण करताना खूप होतो. संस्कृत सुभाषिते हा ज्ञानाचा खजिना आहे. दोन ओळीत सुभाषित जितके सांगते तितके २०० ओळीचा निबंध लिहून देखील सांगता येणार नाही अशी ताकद सुभाषितांमध्ये आहे. तेव्हा टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संस्कृत परीक्षांना आम्हाला बसवले जायचे. **शाळेतील अभ्यासक्रमास पूरक आणि अभ्यासक्रमा व्यतिरिक्त जे उपक्रम चालायचे त्याचा प्रचंड फायदा होतो.** ते चालू ठेवायलाच पाहिजे. मला असे जाणवते, की सध्याच्या काळात आमच्याप्रमाणे मैदान हा विषय मागे पडत चालला आहे त्याची पण सक्ती करायला हवी असे वाटते. खेळातून काटकपणा येतो, ताकद वाढते. शरीराचे फार लाड केले नाहीत तरी चालतील असे आपल्याला लक्षात येते. आजकाल तुम्हाला संडास साफ करायला सांगितले की लोक म्हणतील की आम्हाला संसर्ग होईल त्याचे काय? हा विचार सुद्धा तेव्हा आमच्या कुणाच्या मनात आला नाही. **आपल्यावर जे कळत नकळत संस्कार होतात त्याचा हा परिणाम असा होतो की आपण कुठल्याही क्षेत्रात उठून दिसतो.** आम्ही शिक्षकांना वामनराव, यशवंतराव असे म्हणायचो, कधी अभ्यंकर सर असे म्हणलो नाही. आजही ताई-दादा असे तुम्ही म्हणत असाल त्याने एक जो कौटुंबिक जिव्हाळा तयार होतो, हे आपल्या शाळेचे वैशिष्ट्य आहे. आम्हाला कधीही कुठलाही प्रश्न विचारायची बंदी नव्हती. **आम्हाला शिक्षकांची आदरयुक्त भीती वाटायची पण आम्हाला कुठलाही प्रश्न विचारायचे स्वातंत्र्यसुद्धा होते. हे स्वातंत्र्य सगळीकडे नसते आणि हे आपल्या शाळेचे मोठे वेगळेपण आहे.**

माझ्यावर डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे काही काळ दायित्व आहे. शिक्षण क्षेत्रात बदलाच्या गप्पा मारतात पण हे करणार कोण? तर आपणच ते करायचे आहे. गृहमंत्र्याने सुरक्षेचा प्रश्न वाढला आहे हे सांगण्यात किंवा परराष्ट्रमंत्र्याने आपले इतर देशांचे संबंध बिघडत आहेत हे सांगण्यात काहीच अर्थ नाही, त्यांनीच काम करणे अपेक्षित आहे. तसे मी टीका करण्यापेक्षा शिक्षणक्षेत्रात जमेल तशा सुधारणा करण्यावर भर देतो. यासोबतच घरचा अध्यात्मिक वारसा, कीर्तन, प्रवचन यामध्ये देखील मला करण्यासारखे खूप काही दिसत आहे.



**माझ्या डोक्यात एक पक्की खूणगाठ आहे की समाज आणि परिस्थिती आपोआप बदलत नसते. समाज ही intangible गोष्ट आहे. अनेक व्यक्तींचा मिळून समाज बनतो. त्यामुळे व्यक्ती सुधारली की समाज सुधारेल.** व्यक्ती सुधारणे, त्याच्यावर भारतीय संस्कृतीचे चांगले संस्कार होणे, गीता-ज्ञानेश्वरी ही तरुणपणी वाचायची गोष्ट आहे हे त्यांच्यापर्यंत पोचवणे मला महत्त्वाचे वाटते. माझ्या वडिलांचे 'वाटा आपल्या हिताच्या' नावाचे पुस्तक आहे. त्यामध्ये प्रश्नोत्तर रूपात लेखन आहे आणि त्याचे ऑडिओबुक देखील केलेले आहेत. त्यामध्ये पुढील प्रश्न आहेत. आपल्याकडे परमार्थ म्हणजे लोकांची महत्वाकांक्षा मारली जाते का? जातीव्यवस्थेची भूमिका काय? पैसे कमावणे हे पाप आहे का? तर अजिबात नाही. गरीब राहणे हा अभिमानाचा विषय नाही. "Earn more, spend more and save more' हे आपल्याकडे सांगितले जातेच, फक्त चांगल्या मार्गाने पैसे कमवा. असे सगळे विषय लोकांपुढे घेऊन जायला लागतील. 'रूप पालटू देशाचे' यासाठी व्यक्तीपासून सुरू करायचे. आपल्या ताकदीने जितके होईल तेवढे आपण करत राहायचे हे मी ठरवले आहे. आत्ता मी साठीमध्ये आहे आणि पुढची पाच वर्षं नक्की कार्यरत (ॲक्टिव लाईफ) आहे.



**वडिल व पत्नी यांच्या बरोबर हिमालयात**

प्रबोधिनीमध्ये असताना काही समज असे. उदा. दारू पिणे चांगले की वाईट? असे प्रश्न असायचे आणि अर्थात शाळेत सर्वांनाच दारू पिणे वाईट हे शिकवायला हवे. पण प्रशालेतून बाहेर पडताना समज असा झाला की माणूस दारू पितो म्हणजे हा हलकट आहे, दुष्ट आहे. प्रत्यक्षात व्यवहारात माझ्या असे लक्षात आले की दारू पिणारा प्रत्येक जण वाईट असतोच असे नाही. काही लोक प्रोटोकॉल म्हणून घेतात, काही जण बरे वाटतं म्हणून घेतात. अर्थात याचे समर्थन मी करत नाही पण आपला दृष्टीकोन कसा बदलतो याचे हे उदाहरण आहे. वेळ पाळायची शिस्त आपल्याला लागलेली असते. मग जो माणूस वेळ पाळत नाही तो निरुपयोगी आहे असा समज मी करून घेतला होता. पण लक्षात आले की असे नेहमीच नसते. काही लोक सकाळी उठायला कंटाळा करतात पण रात्री उशिरापर्यंत ते काम करतात. त्यामुळे प्रत्येक गोष्टीत लोकांची भूमिका समजून घेतली पाहिजे. आपण आग्रह धरावा, दुराग्रह धरू नये! आपल्यासारखे सर्वांनी वागलेच पाहिजे असे नाही. हिमालयात मी ट्रेकिंगला जातो तिथले लोक थंडीत रोज आंघोळ करत नाहीत आणि जास्त घाम येत नसल्याने त्यांना गरज देखील नसते. माझ्या मनात सुरुवातीला त्यांच्या बद्दल अढी होती पण ती नंतर दूर झाली. अशा गोष्टी परिस्थिती सापेक्ष असतात.



BMCC मध्ये जोशी म्हणून प्राध्यापक होते त्यांनी मला ४० वर्षांपूर्वी सांगितले होते की तू कंपनी सेक्रेटरी हो. त्यावेळी कंपनी सेक्रेटरी हा विचारच खूप नवीन होता पण त्यांच्याजवळ ती दूरदृष्टी होती. अध्यात्मिक आणि पारमार्थिक क्षेत्रात माझ्यासमोर वडिलांचाच आदर्श आहे. **एकीकडे मी धोतर उपरणे घालून कीर्तन करतो आणि दुसरीकडे सुटबुट घालून दिल्लीत इंग्रजीमध्ये वादविवाद पण करतो.** DES ला १४० वर्षांची परंपरा आहे आणि त्याचे एक दडपण देखील असते की टिळकांनी, आगरकरांनी आणि चिपळूणकरांनी स्थापन केलेल्या संस्थेचे आपण पदाधिकारी आहोत त्यामुळे समाजात वावरताना आपण जबाबदारीने वागायला हवे. आपले वागणे टिळकांना आवडले असते का? असे प्रत्येक क्षेत्रातले आदर्श आहेत.



मी ज्या-ज्या क्षेत्रात काम करतो तिथे प्रत्येक ठिकाणी मला मार्गदर्शक व्यक्ती भेटल्या आहेत. प्रबोधिनीतल्या व्यक्ती आहेतच पण कंपनी सेक्रेटरीच्या क्षेत्रात डॉ. चंद्रात्रे म्हणून पुण्यातील व्यक्ती आहे. अतिशय हुशार व्यक्तिमत्त्व! त्यांच्याकडून

मी खूप शिकलो. अगदी कंपनी कायदे कसे वाचायचे, लोकांशी संवाद कसा साधायचा हे शिकलो. आमचे CA कै. ती. अरुण हरी जोशी होते, त्यांच्याकडे मी काही काम केले. आज ते नाहीत पण त्यांच्याकडे मी खूप शिकलो. रोज दैनंदिनी लिहिली पाहिजे हा त्यांनी आग्रह धरला आणि करवून घेतले. ते म्हणाले, **आयुष्यात जर तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फ ! समोरचा कितीही वेडेवाकडे बोलला तरी आपण न रागवता त्याला शांतपणे कायदे समजावून सांगता आले पाहिजेत.**



**प्रबोधिनीचे ऋण फेडता न येण्यासारखे आहे. त्याने आयुष्याला वळण लागले. हुशार मुले वीजेसारखी असतात चांगल्या कामाला लावली तर विधायक वापर होतो अन्यथा एका झटक्यात जाळून पण टाकू शकतात. वाफ यंत्रात गेली तर इंजिन ओढू शकते पण नुसतीच फुस्स झाली तर कुणाच्या डोक्यावरची टोपी पण उडवू शकणार नाही. हुशार मुलांमध्ये, निवडलेल्या मुलांमध्ये ती ताकद असते आणि त्याला दिशा देण्याचे काम प्रबोधिनी करत आहे. प्रशालेत खूप स्वातंत्र्य होते. प्रश्न विचारायची, प्रयोग करण्याची, चुका करण्याची आणि सुधारण्याची मुभा होती.** मला संगीताची आवड आहे आणि मी सेक्सोफोन वाजवतो. संगीताची ही आवड पद्य म्हणताना शाळेतच लागली. शाळेत जे शिकलो ते खरे भांडवल आहे. आपण अनेक प्रयोग करत असतो. आता त्याचा प्रचार आणि प्रसार व्हायची गरज आहे. तेव्हा फक्त ५१० सदाशिव, पुणे प्रशाला होती. आता निगडी, सोलापूर अंबाजोगाई अशी केंद्रे तयार झाली आहेत. आमच्या काळी ५१० मध्ये देखील दोनच मजले होते. त्याला लाकडी जिने होते आणि आम्ही धाडधड करत त्यावरून जात असू. शाळेने निधी संकलन करायला शिकवले. लोकांकडे जाऊन चांगल्या कामासाठी हात पसरवायला शिकवले. आम्ही त्या निधी संकलन अभियानातून अगदी एक, दोन आणि पाच रुपयाच्या पावत्या देखील फाडलेल्या आहेत. परांडेवाड्याच्या मागे गोळीवाले होते त्यांच्याकडे एका पैशाला तीन गोळ्या मिळायच्या आणि पाच पैशाला पेरू मिळायचा. पैशाला किम्मत होती आणि **निधी संकलन करायला वेगळे कौशल्य लागायचे. फटाके विक्रीमधून वेगळे कौशल्य संपादन व्हायचे. अशा गोष्टी वर्गात शिकून होत नाहीत तर रस्त्यावर उतरूनच शिकायला मिळतात.**

आजच्या तरुण प्रबोधकांना मी सांगेन की **१. प्रबोधिनीला विसरू नका. २. प्रबोधिनीमध्ये जे शिकलात ते विसरू नका. ३. देशासाठी काहीतरी काम करा.** स्वत:साठी सगळेच काम करतात. चिमणी आणि कावळे पण पोटासाठी वणवण भटकतात. त्यामुळे इतरांसाठी जगा. आणि गीतेतला एक श्लोक आहे –

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ।। ५.६ ।।**

त्याचा अर्थ असा, तुम्हीच तुमचे बंधु आहात आणि तुम्हीच तुमचे शत्रू आहात. तुम्हीच तुमचा ऱ्हास करून घेऊ नका. तुम्हीच तुमचा उद्धार करा. मार्गदर्शक अनेक असतील पण रस्ता तुम्हालाच चालायचा आहे. पाणी तुम्हालाच प्यायला लागणार आहे! भरपूर मजा करा पण तितक्याच चांगल्या गोष्टी देखील करा.



**कै. सुषमा स्वराज यांच्या बरोबर संपदा सहकारी बँक संचालक मंडळ**



**मंत्री श्री. सचिन पायलट यांची दिल्ली येथे भेट**




पाकिस्तानमध्ये परिषदेसाठी



केनिया येथे इंटरनॅशनल कंपनी सेक्रेटरी संघाची परिषद

## Rapid Fire

१. आवडता चित्रपट – 'टोरा टोरा टोरा' असा दुसऱ्या महायुद्धाबद्दलचा जपानी सिनेमा आहे.

२. आवडते पुस्तक – भगवद्‌गीता

३. आवडता अर्थतज्ज्ञ – चाणक्य

४. तुमचा छंद / आवड – हिमालयात भटकणे !

५. पहिली प्रतिक्रिया

- पैसा – भरपूर कमवा, भरपूर खर्च करा, भरपूर साठवा
- व्यवस्थापन – सगळ्यांना सोबत घेऊन मध्य मार्ग काढणे.
- अध्यात्म – अपरिहार्य गोष्ट आहे. अध्यात्माशिवाय माणूस स्वत:ला माणूस म्हणवून घ्यायला लायक नाही.
- आप्पा पेंडसे – ते नसते तर आम्ही आज कुठे असतो ही कल्पनाच करवत नाही!
- ज्ञान प्रबोधिनी – मातृसंस्था, आई इतकीच महत्त्वाची!

६. जर पुन्हा नव्याने आयुष्य जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल / कोणत्या क्षेत्रात काम करायला आवडेल? (आत्ताच्या क्षेत्रा व्यतिरिक्त)

– काही नाही. आहे ते उत्तम आहे आणि त्यात समाधानी आहे !

**महेश आठवले**
**9822595741**
**mahesh.athavale@kanjcs.com**

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे    संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org